Ested 1969

Principal
Dr. S.D. Pawar
(M.A. Ph.D.)

Koyana Education Society's

# BALASAHEB DESAI COLLEGE , PATAN

Arts, Commerce, Science (UG & PG), B.C.A., B. Com. IT,Junior & Vocational

## बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण

कला , वाणिज्य, विज्ञान (पदवी व पदव्युत्तर ) , बी.सी.ए. , बी.कॉम आय.टी. कनिष्ठ आणि व्यवसाय अभ्यासक्रम

Patan - 415206 , Dist- Satara (Maharastra)

Phone : (02372) 283047, E-Mail- str_bdcp@rediffmail.com, Website: www.bdcp.edu.in

NAAC 'A+' 'Grade' (CGPA 3.35), DST-FIST (O Level), DBT STAR College

A+ NAAC CGPA 3.35

ISO

* Balasaheb Desai College, Patan * Dist. Satara


# ऐक्य





१) माजी सैनिकांचा सत्कार करताना प्रशांत कदम, समवेत संजीव चव्हाण, डॉ. एस. डी. पवार व डॉ. विद्या पाटील.
२) चित्तथरारक कसरती सादर करताना विद्यार्थी.

## बी. डी. कॉलेजतर्फे माजी सैनिकांचा सन्मान कौतुकास्पद : कदम

पाटण, दि. २८ : वीरमाता, वीरपत्नी, त्याचबरोबर सैनिकांचे देशासाठीचे योगदान व त्याग न विसरता येण्यासारखे आहे. त्यांच्यामुळेच आज आपण सुरक्षित आहोत. मात्र माजी सैनिकांची केवळ २६ जानेवारी व १५ ऑगस्ट रोजीच आठवण येते, अशी खंत व्यक्त करत माजी सैनिकांच्या अनेक अडचणी आहेत. त्यांचे प्रश्न केवळ कागदावरच राहिले आहेत. ते सोडवण्यासाठी सर्वांनी संघटितपणे एकत्रित आले पाहिजे. सातारा जिल्हा सैनिक फेडरेशन यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. बी. डी. सी. कॉलेजने वीरमाता, वीरपत्नींसह आजी-माजी सैनिकांच्या सन्मानार्थ आयोजित केलेला कार्यक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन सातारा जिल्हा सैनिक फेडरेशनचे अध्यक्ष प्रशांत कदम यांनी केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्यावतीने बी. डी. सी. महाविद्यालय, आयक्युसी व पाटण रोटरी क्लबच्यावतीने पाटण तालुक्यातील आजी-माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी यांच्या सत्कार समारंभप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक संजीव चव्हाण होते. यावेळी पाटण रोटरीच्या अध्यक्षा डॉ. विद्या पाटील, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, लेफ्टनंट संतोष पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रशांत कदम म्हणाले, पाटण बी. डी. कॉलेजच्या विद्यार्थिनींची दिल्लीत होणाऱ्या परेडसाठी निवड होणे ही पाटण तालुक्याच्यादृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे. बी. डी. कॉलेजमध्ये पोलीस भरतीसह मिलिटरी भरतीचे प्रशिक्षण दिले जाते ही आनंदाची बाब आहे. माजी सैनिकांनीही अशा चांगल्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे गरजेचे आहे. देशासाठी ज्यांनी बलिदान दिले त्यांची आठवण म्हणून माजी सैनिकांनी पुढील तरुण पिढीला सांगून आपली यशोगाथा त्यांच्यापुढे मांडली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

संजीव चव्हाण म्हणाले, सैनिक सीमेवर डोळ्यात तेल घालून देशाचे रक्षण करत असल्यामुळेच आज आपण सर्वजण सुरक्षित आहोत. त्यांची देशसेवा प्रत्येक भारतीय नागरिकाने लक्षात ठेवली पाहिजे. त्यांच्या कायम ऋणात राहिले पाहिजे. तुमचे आम्ही काही तरी देणे लागतो या हेतूनेच आजचा कार्यक्रम आयोजित केला आहे. माजी सैनिकांसाठी महाविद्यालयामार्फत काही करण्यासारखे असेल तर ते आम्हाला जरूर सांगा. देशाचे आदर्श नागरिक या महाविद्यालयातून घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीमधील विविध शाळांचे देशभक्तिपर गीतांचे आयोजन केले होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बी. डी. कॉलेजतर्फे आजी-माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला तसेच पाटण रोटरी क्लबतर्फे सैनिकांना भेटवस्तू देण्यात आली. प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी स्वागत केले. प्रा. पी. आर. पाटणकर व प्रा. ए. एल. शिर्के यांनी सूत्रसंचालन केले. वीरमाता, वीरपत्नी व माजी सैनिक सत्कार समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. डी. डी. थोरात यांनी केले. लेफ्टनंट डॉ. एस. एस. कुंभार यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

**वीर डेमोचे सादरीकरण**

यावेळी भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील एनसीसी शाखेच्या विद्यार्थ्यांनी परेड व चित्तथरारक कसरती करून दाखवल्या तसेच वीर डेमोही सादर केला. डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या हा वीर डेमो पाहण्यासाठी महाविद्यालयात मोठी गर्दी झाली होती. सातारा जिल्ह्यात बी. डी. कॉलेज या एकमेव महाविद्यालयात प्रतिवर्षी अशाप्रकारचा कार्यक्रम होत असतो. यावेळी डेमोत सहभागी झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचे आजी-माजी सैनिकांसह उपस्थित सर्वांनीच कौतुक केले.

## राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी इंद्रजित गुं



फलटण, दि. २८ : फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित मुधोजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, फलटणचा विद्यार्थी इंद्रजित गुजवटेची शालेय क्रिकेट राज्यस्तरीय स्पर्धेतील १४ वर्षे (मुले) वयोगटातील निवड चाचणी स्पर्धेसाठी विभागीय निवड चाचणी स्पर्धेतून निवड झाली आहे. या निवडीबद्दल इंद्रजितचे विविध स्तरावरून अभिनंदन होत आहे.

राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा दि.

Dr.(Dr.) Santosh Prakash Patil
Associate NCC Office (ANO)
Balasaheb Desai College Patan

Dr.Hemlata V. Kate
Coordinator, IQAC
Balasaheb Desai Collage, Patan

PRINCIPAL
Balasaheb Desai Collage
Patan, Dist: Satara

# ऐक्य

## प्रा. डॉ. संतोष पाटील यांची लेफ्टनंटपदी निवड

▲ पाटण, दि. २४ : अंजनी गावचे सुपुत्र व बाळासाहेब देसाई महाविद्यालयामधील भूगोलशास्त्र विभागातील सहाय्यक प्रा. डॉ. संतोष प्रकाश पाटील यांची भारतीय लष्करामध्ये लेफ्टनंट या (राजपत्रित अधिकारी गट अ) पदी निवड करण्यात आली. ही निवड राष्ट्रीय कॅडेट कोर, ऑफिसर मेजर जनरल कुलदीप जितसिंग राठोड ब्रिगेडिअर हिरन देसाई, लफ्टनंट कर्नल गिरीश दत्त, मेजर शैलेंद्र वर्मा, मेजर अंकित मदन, मेजर सौरभ तिवारी या नॅशनल कॅडेट कोअर ऑफिसर ट्रेनिंग ॲकॅडमी, नागपूर टीमने केली.

डॉ. पाटील यांची २०२१ मध्ये पुणे या ठिकाणी मुख्य मुलाखत यशस्वी झाली होती. यानंतर ऑफिसर ट्रेनिंग ॲकॅडमी, नागपूर या ठिकाणी तीन महिन्याच्या खडतर प्रशिक्षणानंतर आज त्यांची लेफ्टनंटपदी निवड करण्यात आली.

या प्रशिक्षणामध्ये शारीरिक, मानसिक व बौद्धिक या तिन्ही चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर अंतिम गुणवत्ता यादीमध्ये त्यांची



निवड करण्यात आली. या प्रशिक्षणामध्ये ड्रिल, मॅप रिडिंग, फायरिंग, बौद्धिक परीक्षा, शारीरिक चाचणी यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्यांचाच अंतिम यादीमध्ये समावेश होतो. १०० मीटर धावणे, फायरिंग यामध्ये त्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले आहे. नॅशनल कॅडेट कोर, ऑफिसर ट्रेनिंग ॲकॅडमी, नागपूर ही नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी व इंडियन मिलिटरी ॲकॅडमी, डेहराडूनला समकक्ष ॲकॅडमी असून देशभरातील ऑफिसर तयार करणारी एकमेव संस्था आहे.

या ठिकाणी प्रशिक्षण घेण्यासाठी विविध देशांच्या कानाकोपऱ्यातून ७५० हून अधिक प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. दिल्ली, चेन्नई, कोलकत्ता, जम्मू-काश्मीर, आसाम, मणिपूर, तमिळनाडू, कर्नाटक, केरळ या राज्यातील प्राध्यापकांपैकी १७१ जणांची अंतिम यादीत निवड करण्यात आली. यामध्ये अंजनीसारख्या ग्रामीण भागातील युवकाने सर्वोत्कृष्ट एनसीसी ऑफिसरचा पुरस्कार मिळवल्याबद्दल सर्वस्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रा. संतोष पाटील यांची लेफ्टनंटपदी निवड झाल्याबद्दल माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर, राष्ट्रवादीचे नेते सत्यजितसिंह पाटणकर, कोयना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष प्रकाश पाटील, जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, अधीक्षक विजय काटे यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी अभिनंदन केले तसेच कमांडिंग ऑफिसर १९ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. कराडचे कर्नल जे. पी. सप्तगिरी व ॲड. ऑफिसर कर्नल दिनेश कुमार झा यांनी विशेष अभिनंदन केले.

Sanket Times Main Edition
Oct 25, 2022 Page No. 6
Powered by : erelego.com
DainikAikya https://www.DainikAikya.com

# दै. प्रीतिसंगम

## प्रा.डॉ.संतोष पाटील यांची भारतीय लष्करात लेफ्टनंट पदी निवड

**पाटण/प्रतिनिधी:-**

अंजनी गावचे सुपुत्र व बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण मधील भूगोलशास्त्र विभागातील सहाय्यक प्रा.डॉ संतोष प्रकाश पाटील यांची भारतीय लष्करामध्ये लेफ्टनंट या (राजपत्रित अधिकारी गट अ) पदी निवड करण्यात आली. ही निवड राष्ट्रीय कॅडेट कोर. ऑफिसर ट्रेनिंग अकादमी नागपूर चे कमांडिग ऑफिसर. मेजर जनरल कुलदीप जितसिंग राठोड. ब्रिगेडीयर हिरन देसाई. लेफ्टनंट कर्नल गिरीश दत्त, मेजर शैलेंद्र वर्मा, मेजर अंकित मदन, मेजर सौरभ तिवारी. या नॅशनल कॅडेट कोअर. ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी नागपूर टीमने दिनांक २२ऑक्टोबर २०२२ रोजी निवड करण्यात आली.

यापूर्वी डॉ. पाटील यांची २०२१ मध्ये मुख्य मुलाखत पुणे या ठिकाणी यशस्वी झाली होती. यानंतर ऑफिसर ट्रेनिंग अकादमी नागपूर या ठिकाणी तीन महिन्यांच्या खडतर प्रशिक्षणानंतर आज त्यांची लेफ्टनंट पदी निवड करण्यात आली. या प्रशिक्षणामध्ये शारीरिक, मानसिक व बौद्धिक या तिन्ही चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी मध्ये त्यांची निवड करण्यात आली. या प्रशिक्षणामध्ये ड्रिल. मॅप रीडिंग. फायरिंग, बौद्धिक परीक्षा, शारीरिक चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्यांचाच अंतिम यादीमध्यें समावेश होतो. यामध्ये शंभर मीटर धावणे, फायरिंग यामध्ये सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

नॅशनल कॅडेट कोर, ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी नागपूर (OT-)ही नॅशनल डिफेन्सअकॅडमी (ND- ) व इंडियन मिलिटरी अकॅडमी डेहराडून (IM-) ला समकक्ष अकॅडमी असून देशभरातील ऑफिसर तयार करणारी एकमेव संस्था आहे. या ठिकाणी प्रशिक्षण घेण्यासाठी देशाच्या विविध कानाकोपऱ्यातून ७५० हून अधिक प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. दिल्ली, चेन्नई, कोलकाता, जम्मू काश्मीर, आसाम, मणिपूर तामिळनाडू, कर्नाटक, केरळ या राज्यातील प्राध्यापकांपैकी एक १७१ जणांची अंतिम यादीत निवड करण्यात आली. यामध्ये अंजनीसारख्या ग्रामीण भागातील युवकाने सर्वोत्कृष्ट एन. सी. सी. ऑफिसरचा पुरस्कार मिळविल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तासगाव तालुक्याच्या पूर्व टोकाकडील अग्रनी नदीच्या काठावर वसलेलं छोटसं गाव म्हणजे अंजनी होय. यागावाची ओळख म्हणजे स्वर्गीय आर.आर. आबा यांचे गाव पण त्याच प्रमाणे इंजिनियर निर्माण करणारें गाव, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विविध अधिकारी घडविणारे गाव, देशाच्या सीमेवर लढणाऱ्या सैनिकाचे गाव, ज्ञानदान करणारे शिक्षक, प्राध्यापक तयार करणारे गाव, आदर्श शेती बरोबरच राजकारण व समाजकारणात अग्रेसर असणारे गाव म्हणून अंजनी गावची ओळख आहे. आणि याच अंजनी गावचे सुपुत्र प्रा.संतोष प्रकाश पाटील यांची आज लेफ्टनंटपदी निवड झाल्यामुळे अंजनी गावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.



एस.मोहिते

प्रा.संतोष पाटील यांची लेफ्टनंटपदी निवड झाल्याबद्दल माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर, राष्ट्रवादीचे नेते सत्यजितसिंह पाटणकर, कोयना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष प्रकाशभाऊ पाटील, जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संचालक संजीवदादा चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. पवार, अधीक्षक विजय काटे, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवकवर्ग यांनी अभिनंदन केले तसेच व कमांडिंग ऑफिसर १९ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. कराड चे कर्नल जे.पी. सप्तगिरी व ॲड.ऑफिसर कर्नल दिनेश कुमार झा यांनी विशेष अभिनंदन केले

Lt.(Dr.) Santosh Prakash Patil
Associate NCC Office (ANO)
Balasaheb Desai College Patan

Dr.Hemlata V. Kate
Coordinator, IQAC
Balasaheb Desai Collage, Patan

PRINCIPAL
Balasaheb Desai Collage
Patan, Dist: Satara

एकमेव विचारपत्र

# महाराष्ट्र न्यूज



Website : https://mahanewsnet.com | Youtube : www.youtube.com/channel/MaharashtraNewsLive | Facebook Page : MaharashtraNews Live

## प्रा.डॉ .संतोष पाटील यांची लेफ्टनंट पदी निवड




[illegible]

PRINCIPAL
Balasaheb Desai Collage
Patan, Dist: Satara

Lt.(Dr.) Santosh Prakash Patil
Associate NCC Office (ANO)
Balasaheb Desai College Patan

Dr.Hemlata V. Kate
Coordinator, IQAC
Balasaheb Desai Collage, Patan

Balasaheb Desai College, Patan ★ Dist. Satara ★

पुण्य नगरी

# बीडीसी कॉलेजचा उपक्रम कौतुकास्पद : प्रशांत कदम

पाटण / प्रतिनिधी

वीरमाता, वीरपत्नी त्याचबरोबर सैनिकांचे देशासाठीचे योगदान, त्याग न विसरता येण्यासारखे आहे. त्यांच्यामुळेच आज आपण सुरक्षित आहोत. मात्र माजी सैनिकांची केवळ २६ जानेवारी, १५ ऑगस्ट रोजीच आठवण येते, अशी खंत व्यक्त करत माजी सैनिकांच्या अनेक अडचणी आहेत. त्यांचे प्रश्न केवळ कागदावरच राहिले आहेत. ते सोडवण्यासाठी सर्वांनी संघटीतपणे एकत्रित आले पाहिजे. सातारा जिल्हा सैनिक फेडरेशन यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. बी. डी. सी. कॉलेजने वीरमाता, वीरपत्नीसह आजी-माजी सैनिकांच्या सन्मानार्थ आयोजित केलेला कार्यक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन सातारा जिल्हा सैनिक फेडरेशनचे अध्यक्ष प्रशांत कदम यांनी केले.



बीडीसी कॉलेज्यावतीने आयोजित कार्यक्रमात सैनिकांचा सत्कार करताना मान्यवर.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्यावतीने बी. डी. सी. महाविद्यालय, आयक्युसी, पाटण रोटरी क्लबच्यावतीने पाटण तालुक्यातील आजी-माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी यांचा सत्कार समारंभाप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक संजीव चव्हाण होते. यावेळी पाटण रोटरीच्या अध्यक्षा डॉ. विद्या पाटील, प्राचार्य डॉ.एस. डी.पवार, लेफ्टनंट संतोष पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रशांत कदम पुढे म्हणाले, पाटण बी.डी.कॉलेजची विद्यार्थीनींची दिल्लीत होणाऱ्या परेडसाठी निवड होणे ही पाटण तालुक्याच्यादृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे. बी. डी. कॉलेजमध्ये पोलीस भरतीसह मिल्ट्री भरतीचे प्रशिक्षण दिले जाते ही आनंदाची बाब आहे. संजीव चव्हाण म्हणाले, माजी सैनिकांसाठी महाविद्यालयामार्फत काही करण्यासारखे असेल तर ते आम्हाला जरूर सांगा. देशाचे आदर्श नागरीक या महाविद्यालयातून घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी कोयना एज्युकेशन सोसायटीमधील विविध शाळांचे देशभक्तीपर गीतांचे आयोजन केले होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बी. डी. कॉलेजतर्फे आजी-माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. तसेच पाटण रोटरी क्लबतर्फे सैनिकांना भेटवस्तू देण्यात आली. प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी स्वागत केले. प्रा. पी. आय. पाटणकर मॅडम व प्रा. ए. एल. शिर्के यांनी सुत्रसंचालन केले. वीरमाता, वीरपत्नी व माजी सैनिक सत्कार समारंभाचे सुत्रसंचालन प्रा. डी. डी. थोरात यांनी केले. लेफ्टनंट डॉ. एस. एस. कुंभार यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## वॉर डेमोचे सादरीकरण

याप्रसंगी भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित साधत बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील एनसीसी रायफलड्रीलच्या विद्यार्थ्यांनी परेड व चित्त थरारक कसरती करून दाखवल्या. तसेच वॉर डेमोही सादर केला. डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या हा वॉर डेमो पाहण्यासाठी महाविद्यालयात गर्दी झाली होती.

Satara Edition
Jan 29, 2024 Page No. 04
Powered by : eReleGo.com

Lt.(Dr.) Santosh Prakash Patil
Associate NCC Office (ANO)
Balasaheb Desai College Patan

Dr.Hemlata V. Kate
Coordinator, IQAC
Balasaheb Desai Collage, Patan

PRINCIPAL
Balasaheb Desai Collage
Patan, Dist: Satara

Balasaheb Desai College, Patan ★ Dist. Satara ★